# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मा. मुख्यमंत्री यांनी निश्चित केलेल्या ७ कलमी मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी सुरू**
- **प्रभाग समिती क्रमांक ०२, ०३ कार्यालय, उद्यान विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग याठिकाणी मा. आयुक्त यांनी दिली भेट**

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सात कलमी कृती कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार, दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, उद्यान विभाग, प्रभाग समिती क्रमांक ०२ कार्यालय, प्रभाग समिती क्रमांक ०३ कार्यालय, ग्रंथालय, अभ्यासिकेची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला.

मा. मुख्यमंत्री यांनी निश्चित केलेल्या सात कलमी कृती कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, महापालिकेतर्फे विविध उपक्रम आणि मोहीम राबविण्यायत येत आहे. त्यात स्वच्छता सप्ताहाचा समावेश आहे. त्यानुसार दर दिवशी दैनंदिन सफाईबरोबर एक दिवस सर्व उद्याने, शासकीय कार्यालये, सर्व पदपथे अशा स्वरुपाचा हा सफाई सप्ताह असणार आहे. पाहणी दरम्यान मा. आयुक्त यांनी कार्यालयात नियमित स्वच्छता राखण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. कार्यालयातील फाईल्स, महत्त्वाचे कागदपत्रे, अभिलेख यांचे योग्य त्याठिकाणी जतन करण्यात यावे असे निर्देशित केले. कार्यालय परिसरातील स्वच्छते बरोबर कार्यालयातील शौचालयाची स्वच्छता राखण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच बसण्याकरिता उत्तम सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देशित करण्यात आले. सदर प्रसंगी अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, प्रभाग अधिकारी, कनिष्ठ अभियंता व कर्मचारी उपस्थित होते.